आमच्यात गोंधळाचे वातावरण करण्यासाठीच भाजपाने बातम्या पेरल्या, बाळासाहेब थोरातांचा आरोप >> पान 2

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली विजया रहाटकर यांची भेट >> पान 3

बुलढाणा जिल्ह्यात अपूर्ण कामे पूर्ण दाखवून शासनाची फसवणूक, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



शाहरुख-रणबीर कपूरने जे केले, आता ते करणार अजय देवगण, ३५० कोटी कमावताच इतिहास रचणार!

आतील पान

**सुविचार**

हसत राहिलात तर पूर्ण जग आपल्यासह आहे, नाही तर डोळ्यातील अश्रूंनाही डोळ्यामध्ये जागा मिळत नाही.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 77 ■ बुधवार, दि. 23 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून एबी फॉर्मचे वाटप सुरु

## निलेश लंकेंच्या पत्नीसह ३ जणांनी घेतला अर्ज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास आजपासून सुरूवात झाली आहे. भाजपने उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आघाडी घेत महायुतीमधील ९९ उमेदवारांची नावे घोषित केली. त्यामुळे, या ९९ उमेदवारांकडून प्रचाराला व मतदारसंघात जोमाने काम सुरू झालं आहे. दुसरीकडे अजित पवार यांनीही राष्ट्रवादीच्या उमेदवारांना एबी फॉर्म दिल्यामुळे उमेदवारांच्या रांगा पक्षाच्या नेत्यांकडे लागल्या आहेत. त्यातच, आज महाविकास आघाडीची नावे जाहीर होण्यापूर्वीच शिवसेना उद्धव ठाकरे व शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार एबी फॉर्म घेऊन जात आहेत. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांकडून खासदार निलेश लंकेंच्या पत्नी राणी लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राणी लंके ह्या पारनेर विधानसभा मतदारसंघातून उमेदवार असतील.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून देखील जे उमेदवार निश्चित झाले आहेत त्यांना एबी फॉर्म द्यायला सुरुवात झाली आहे. मुंबईतून घाटकोपर पूर्वसाठी राखी जाधव, चिपळूण विधानसभेसाठी प्रशांत यादव, पारनेर विधानसभेसाठी राणी लंके यांना एबी फॉर्म देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. मतदारसंघात प्रचारासाठी उमेदवारांना तत्काळ कामाला लागता यावं, यासाठी पक्षाकडून तत्काळ एबी फॉर्म देण्यात येत असल्याची माहिती आहे. तर, शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात येत आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून आजपासून एबी फॉर्म द्यायला सुरवात झाली असून ज्या जागावर तिढा नाही त्या मतदार संघातील उमेदवारांना एबी फॉर्म देण्यात आला आहे. राजापूर लांजा मतदार संघाचे विद्यमान आमदार राजन साळवी यांनी आज मातोश्रीमधून एबी फॉर्म स्वीकारला. तसेच, कुडाळ विधानसभेचे आमदार वैभव नाईक यांचा देखील एबी फॉर्म प्रतिनिधीने स्वीकारला आहे.

दरम्यान, शरद पवारांच्या राष्ट्रवादीत इस्लामपूरमधून जयंत पाटील, हर्षवर्धन पाटील इंदापूरमधून रिंगणात असतील. काटोलमधून माजी गृहमंत्री अनिल देशमुख हे रिंगणामध्ये असतील. कर्जत जामखेडमधून रोहित पवार रिंगणात असतील. घनसावंगी मतदारसंघातून राजेश टोपे, तर मुंब्रामधून जितेंद्र आव्हाड असतील. कवठे महाकाळमधून स्वर्गीय आर आर पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटील, कराड उत्तरमधून बाळासाहेब पाटील, कोरेगावमधून शशिकांत शिंदे, माळशिरसमधून उत्तमराव जानकर, सिंदखेडराजामधून राजेंद्र शिंगणे, राहुरीमधून प्राजक्ता तनपुरे, मुक्ताईनगरमधून रोहिणी खडसे, कागलमधून समरजितसिंह घाटगे, इचलकरंजीमधून मदन कारंडे आणि चंदगडमधून डॉ. नंदिनी बाभुळकर यांचा संभाव्य उमेदवारांच्या यादीत समावेश आहे.

१) जयंत पाटील– इस्लामपूर
२) रोहित पाटील – तासगाव कवठे महांकाळ
३) मानसिंग नाईक– शिराळा
४) बाळासाहेब पाटील– कराड उत्तर
५) शशिकांत शिंदे– कोरेगाव
६) दीपक चव्हाण– फलटण
७) शिरुर– अशोक
८) इंदापूर– हर्षवर्धन पाटील
९) वडगाव शेरी– बापू पठारे
१०) माळशिरस– उत्तमराव जानकर
११) कर्जत जामखेड– रोहित पवार
१२) काटोल– अनिल देशमुख
१३) विक्रमगड– सुनील भुसारा
१४) घनसावंगी – राजेश टोपे
१५) मुंब्रा – जितेंद्र आव्हाड
१६) जिंतूर– विजय भांबळे
१७) अहेरी– भाग्यश्री अत्राम
१८) सिंदखेड राजा– राजेंद्र शिंगणे
१९) उदगीर– सुधाकर भालेराव
२०) घाटकोपर पूर्व – राखी जाधव
२१) चिपळूण– प्रशांत यादव
२२) राहुरी –प्राजक्त तनपुरे
२३) मुक्ताईनगर– रोहिणी खडसे
२४) अकोले– अमित भांगरे
२५) पारनेर– राणी लंके
२६) बीड– संदीप क्षीरसागर
२७) केज– पृथ्वीराज साठे
२८) आंबेगाव– देवदत्त निकम
२९) जुन्नर– सत्यशील शेरकर
३०) इचलकरंजी– मदन कारंडे
३१) भूम परंडा– राहुल मोटे
३२) दौंड– रमेश थोरात
३३) कागल – समरतिजसिंह घाटगे
३४) गंगापूर – सतीश चव्हाण
३५) चंदगड – डॉ. नंदाताई बाभूळकर

## गुरुवारी पुन्हा इच्छूक मराठा उमेदवारांची बैठक, मनोज जरांगे पाटील साधणार संवाद : विविध विषयांवर घेण्यात येणार निर्णय



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूक लढविण्यासंदर्भात इच्छूक असलेल्या मराठा उमेदवारांची मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा गुरुवारी दि.२४ ऑक्टोबरला बैठक बोलावली आहे.यावेळी ते विविध विषयांवर चर्चा करून इच्छूक उमेदवारांशी संवाद साधणार आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा निकाली न निघाल्याने मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी त्यांनी या अगोदर मराठा समजाचे म्हणने ऐकून घेतले आहे. तर इच्छूक उमेदवारांची बैठकही घेतली आहे. तर पुढील रणनिती आखण्यासाठी गुरुवार दि.२४ ऑक्टोबर रोजी इच्छुक उमेदवारांची पुन्हा बैठक बोलावली आहे. यावेळी मतदारसंघात उमेदवार देण्यासाठी चर्चा करण्यात येणार आहे. जिथे लढायचे नाही त्या ठिकाणी पाडायचे आहे, असा फॉमुर्ला ठरविण्याबरोबरच इतर विषयांवर निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच इच्छुकांनी मनमानी कारभार करू नये, मतभेद असले तरी ते बाजुला ठेवून समाजकार्याच्या कामासाठी यावे,असे आवाहन करून ते प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील इच्छूक उमेदवारांशी चर्चा यावेळी करणार आहेत. ठरावीक मतदारसंघात उमेदवार उभे करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात येणार आहे. समाजाच्या हिताची आणि निर्णायक चर्चा यावेळी केली जाणार असल्याचेही मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

## आमचे सरकार आल्यानंतर विकासकामांच्या बोगस टेंडरची चौकशी करणार- पृथ्वीराज चव्हाणांचा इशारा

**कराड/प्रतिनिधी :** मोदी, शहा आणि अदानी यांनी नकळत मुंबई हातात घेतली आहे. गेल्या दहा वर्षात भाजपानं महाराष्ट्राला छळले असून अनेक मोठे प्रकल्प गुजरातला नेले. त्यामुळे महाराष्ट्राचा विकास खुंटल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिला.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, '' महाराष्ट्राचा सरकारी मालमत्ता उद्योगपतींच्या घशात घातल्या आहेत. आम्ही आवाज उठवल्यानंतर मंर्त्यांनी श्वेतपत्रिका काढतो, म्हणून सांगितले. ती श्वेतपत्रिका कुठाय?'', असा सवाल केला. आमचे सरकार आल्यानंतर विकासकामांच्या बोगस टेंडरची चौकशी करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

मुंबईचे अर्थिक विकास केंद्र गुजरातला पळवले–कराड दक्षिणमधील काँग्रेसचे उमेदवार पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रचारार्थ काँग्रेस कार्यकर्त्यांनी विजयी निर्धार मेळावा आयोजित केला होता. मेळाव्यात बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, '' भाजपाच्या नेत्यांनी मुंबईचे आर्थिक विकास केंद्र गुजरातला पळवले. कराड–चिपळूण रेल्वे




## पाच कोटी जप्त प्रकरणावरुन राजकारण तापले; पोलीस अधीक्षक म्हणाले...

**पुणे /प्रतिनिधी :** विधानसभेच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून सर्वच पक्षांनी जोरदार तयारी सुरू केलीय. अशातच सोमवारी (२१ ऑक्टोबर) पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर सुरू असलेल्या नाकाबंदीत पुणे पोलिसांकडून ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम सत्ताधारी आमदाराची असल्याचे बोलले जात असून यावर शिवसेना (उध्दव ठाकरे) नेते संजय राऊत तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देखील भाष्य केलेय. मात्र, याबाबत पुण्याचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांना विचारले असता, या पैशाचा राजकीय संबंध काय? याचा अधिक तपास करत असल्याचे त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक आयोगाकडून आचारसंहितेच्या दृष्टीनं नाकाबंदी करत असताना पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटी रूपयांची रोख रक्कम जप्त केली. ज्या गाडीसह ही रक्कम जप्त करण्यात आली ती कार चह ४५ अड २५२६ या क्रमांकाची असुन ती सांगोल्यातील अमोल नलावडे या व्यक्तीच्या नावावर असल्याचं समोर आलंय. रक्कम नेमकी कुठे नेली जात होती? या रक्कमेचा वापर कशासाठी होणार होता? याबाबत अधिक तपास सुरू आहे.याबाबत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख म्हणाले की, ''काल संध्याकाळी जवळपास सव्वा सहाच्या सुमारास खेड शिवापूर टोल नाक्यावर एक पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार चेक करण्यात आली.

## खेड- शिवापूरमध्ये 'रात्रीस खेळ चाले', पैशांचा व्हिडीओ ट्वीट; सत्ताधारी उमेदवारांना पहिला हप्ता २५ कोटींचा, रोहित पवारांचा आरोप



**पुणे /प्रतिनिधी :** खेडमध्ये जप्त केलेली पाच कोटींची रोकड जप्त करण्यात आली आहे. आमदार रोहित पवारांकडून पैशांचा व्हिडीओ ट्वीट करण्यात आला आहे. पुण्याजवळ पकडलेल्या रक्कमेचा हा व्हिडीओ असल्याचा दावा सत्ताधारी उमेदवारांना पहिला हप्ता २५ कोटींचा आल्याचा आरोप आमदार रोहित पवारांनी केला आहे. हे पैसे आमदार शहाजी बापू पाटील यांची असल्याचे रोहित पवार म्हणाले. तसेच आज संध्याकाळपर्यत जागावाटप जाहीर होणार असल्याचे देखील ते म्हणाले.

रोहित पवार म्हणाले, शहाजी पाटील यांचे पैसे आहेत अशी चर्चा आहे. एकूण पाच गाड्या होत्या. २५ कोटी रुपये होते अशी माहिती आहे. लोकसभेला यांनी खूप पैसा वाटला मात्र तरीदेखील लोकांनी यांना स्वीकाराले नाही. आता विधानसभेला ५० कोटी वाटतील असं वाटतंय . जो मलिदा त्यांना मिळालाय तो वाटत आहे . मुंबईतून हा पैसा जात होता. पण महाराष्ट्रातली स्वाभिमानी जनता त्याला बाधणार नाही.जागावाटप आज संध्याकाळपर्यत जागावाटप जाहीर : रोहित पवार

अनेक पदाधिकारी अजित पवारांच्या पक्षातील नाराज आहेत. अनेक जण आमच्या सोबत येत आहेत. जागावाटप आज संध्याकाळपर्यत जागावाटप जाहीर होईल . चर्चा सकारात्मक झाली आहे. जागेच्या वादाचा जो आकडा येतोय तो कमी आहे, असे रोहित पवार म्हणाले.

## महाराष्ट्र केसरी अभिजीत कटके यांच्या घरी प्राप्तीकर विभागाचा छापा, विधानसभेच्या रणधुमाळीत छापेमारी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे /प्रतिनिधी :** महाराष्ट्र केसरी पहिलवान अभिजीत कटके यांच्या पुण्यातील घरी प्राप्ती कर विभागाने छापा टाकला आहे. त्यांच्या घरातून महत्वाची कागदपत्रे पथकाने ताब्यात घेतली आहेत. ऐन विधानसभा निवडणूकीच्या रणधुमाळीत कटके यांच्या घरी छापा पडल्यामुळे खळबळ उडाली आहे. अभिजीत कटके हे भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे मेहुणे आहेत.

अभिजीत यांचे वडील चंद्रकांत कटके यांच्या वाघोलीतील घरात मंगळवारी सकाळी प्राप्ती कर विभागाचे अधिकारी पोहोचले होते. पथकाने कागदपत्रांची झाडाझडती घेत, कटके यांच्याकडे विचारपूसही केली. दरम्यान, कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून बंडखोरी करण्याच्या प्रयत्नातील असल्याची भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांचे सासरे हे चंद्रकांत कटके आहेत. त्यांच्या घरी छपा टाकल्यामुळे ही राजकीय खेळी असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच, सोमवारी रात्री उशिरा खेड शिवापुर टोल नाक्यावर नाकाबंदीत ५ कोटी रूपये नेर्णाया मोटारीला पोलिसांनी अडविले. त्यांच्याकडील रक्कम जप्त करीत कारवाई केली आहे. ही रक्कम शिंदे गटाच्या आमदाराची असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, याबाबत अधिर्कायांनी बोलण्यास नकार दिला आहे.

भाजपचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर हे कोथरुड विधानसभा मतदारसंघातुन विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र, भारतीय जनता पक्षाने चंद्रकांत पाटील यांना संबंधित मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. दरम्यान, यापुर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बालवडकर यांच्या घरी जाऊन त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर भाजपच्या इतर वरिष्ठ नेत्यांनीही त्यांच्यासोबत चर्चा केली होती. बालवडकरांचे सासरे चंद्रकांत कटके यांचे वाघोलीत घर आहे. त्याठिकाणी छापा टाकल्यामुळे खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र केसरी अभिजीत कटके यांनी एकदा महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवला. तर दोन वेळा उपमहाराष्ट्र केसरी ठरले आहे. कटके पुण्यातील शिवरामदादा तालमीचा पहिलवान असून २०१५ मध्ये युवा महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला होता. त्यांनी २०१६ मध्ये ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

# मतदान कार्ड नाही ? तरी करता येणार मतदान !

## आधार, पॅनकार्डसह १२ प्रकारचे ओळखपत्र ग्राह्य

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोजगाने महराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे. तरी जिल्ह्यातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करून मतदानाची टक्केवारी वाढवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र याशिवाय या पुराव्यांमध्ये पारपत्र (पासपोर्ट), वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची दस्तावेज, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, आधार कार्ड, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरली जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे.



एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना माहिती–चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आमच्यात गोंधळाचे वातावरण करण्यासाठीच भाजपाने बातम्या पेरल्या, बाळासाहेब थोरातांचा आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीचे २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे, तर याचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. निवडणुकीला जवळपास एक महिन्याचा कालावधी शिल्लक असताना अजूनही महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाचा तिढा कायम आहे. विदर्भातील १२ जागांवरून ठाकरे गटाने ताठर भूमिका घेतलीय. तर कोणत्याही परिस्थितीत ह्या जागा सोडायच्या नसल्याचं काँग्रेसने ठरवलंय. दरम्यान, महाविकास आघाडीच्या जागावाटपावरून मंगळवारी काँग्रेस नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची मुंबईतील सिल्व्ह ओक येथे भेट घेतली. आमच्या कुठलाही बेबनाव नाही, जागावाटपाचा तिढा लवकरच सुटेल, असंही यावेळी बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. भेटीनंतर त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.



भाजपाने चुकीच्या बातम्या पेरल्या : काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात पुढे म्हणाले की, मी शरद पवारांची भेट घेतली. आमच्या दोघात चांगली चर्चा झाली. दुपारी तीन वाजता पुन्हा महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत जागा वाटपावर चर्चा होईल. दरम्यान, आमच्यामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होण्यासाठी भाजपाने बातम्या पेरल्या, असा आरोप थोरात यांनी भाजपावर केला. महाविकास आघाडीत कोणतेही बेबनाव नाही. आम्ही एकत्रच निवडणूक लढवणार आहोत. शरद पवार यांच्यासोबत माझी सकारात्मक चर्चा झाली. महाविकास आघाडीत किंवा शिवसेना (ठाकरे गटात) कोणतेही मतभेद नसल्याचं यावेळी थोरातांनी सांगितले. मात्र विरोधक आणि मुख्यत: भाजपा आमच्याविरोधात चुकीच्या बातम्या पसरवून गोंधळाची परिस्थिती निर्माण करीत असल्याची टीका बाळासाहेब थोरात यांनी भाजपावर केली.

उद्धव ठाकरेंची भेट घेणार: विदर्भातील १२ जागांवरून महाविकास आघाडीमध्ये अजून तिढा सुटला नाही. या १२ जागांची ठाकरे गटाने मागणी केलीय. तर इथे ठाकरे गटाचे वर्चस्व आणि जनमत नाही, या विदर्भातील १२ जागा हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे, त्यामुळं या जागा आम्हालाच मिळाल्या पाहिजेत, अशी भूमिका काँग्रेसची आहे. एकीकडे भाजपाने पहिली ९९ जणांची यादी जाहीर केलीय. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीत अजून जागांचा तिढा सुटत नाही. महाविकास आघाडीतील यादी जाहीर नसल्यामुळं महाविकास आघाडीत मतभेद आहेत का? असा प्रश्न थोरात यांना विचारला असता, आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत, सर्व काही आलबेल आहे आणि ज्या काही मोजक्या जागांचा तिढा सुटला नाही, त्याबाबत मी आता मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांना भेटण्यासाठी चाललो आहे. त्यांच्याशी चर्चा करणार आणि त्यानंतर दुपारी महाविकास आघाडीची बैठक होईल. या बैठकीतून जागा वाटपाचा तिढा सुटेल आणि लवकरच महाविकास आघाडीची यादी जाहीर होईल, असेही थोरात यांनी सांगितले.

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची जयंती आहे. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजाांरांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. जयंतीदिनी राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

# देशातल्या सर्वात मोठ्या आयपीओचा गुलिगत धोका, गुंतवणूकदारांना चटके; सूचिबद्ध होताच मोठी पडझड!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** या आर्थिक वर्षात आतापर्यंत अनेक महत्त्वाचे आयपीओ येऊन गेले. यातील काही आयपीओंनी गुंतवणूकदारांना मालामाल केलं. यातील काही आयपीओंनी तर आपल्या गुंतवणूकदारांचे पैसे थेट दुप्पट केले. केएआरएन हिट एक्स्चेंजर, पुना गाडगीळ या कंपन्यांचे आयपीओ गुंतवणूकदारांसाठी पैशांचा पाऊस घेऊन आले. दरम्यान, संपूर्ण देशाचे ह्युंदाई मोटर्स इंडिया या कंपनीच्या आयपीओकडे होते. हा आयपीओ आपल्या गुंतवणूकदारांना किती पैसे देणार? असे विचारले जात होते. मात्र देशातला आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ म्हणून नावलौकिक मिळालेल्या या आयपीओने मात्र गुंतवणूकदारांची पुरती निराशा केली आहे.

गुंतवणूकदारांची निराशा

भारतीय शेअर बाजारावर सूचिबद्ध होताच ह्युंदाई मोटर्स इंडिया या कंपनीचा शेअर गडगडला आहे. आयपीओ आला तेव्हा या कंपनीच्या एका शेअरची इश्यू प्राईज १९६० रुपये ठरवण्यात आली होती. मात्र मुंबई शेअर बाजारावर सूचिबद्ध झाला तेव्हा या शेअरचे मूल्य १,९३१ रुपये होते. म्हणजेच तगड्या रिटर्न्सची अपेक्षा असणाऱ्या या शेअरने गुंतवणूकदारांची निराशा केली आहे. इश्यू प्राईजपेक्षा हा शेअर १.४८ टक्क्यांनी शेअर बाजारावर सूचिबद्ध झाला. एनएसईवरही हा शेअर इश्यू प्राईजच्या तुलनेत १.३३ टक्क्यांनी (१,९३४ रुपये) कमी रुपयांवर सूचिबद् झाला.

प्रत्येक शेअरमागे ९५ रुपयांचा तोटा

ह्युंदाई मोटर्सचा शेअर सूचिब्ध झाल्यानंतर १०.३० वाजता त्याचे मूल्य ४.८० रुपयांनी घसरून १,८६५ रुपयांपर्यंत पोहोचले होते. ह्युंदाईचा आयपीओ आला तेव्हा एका लॉटसाठी गुंतवणूकदारांनी १३,७२० रुपये मोजले होते. एका लॉटमध्ये कंपनीने गुंतवणूकदारांना सात शेअर्स दिले होते. शेअर बाजारावर सूचिबद्ध झाल्यानंतर या शेअरमध्ये साधारण ९५ रुपयांची घट पाहायला मिळाली. म्हणजेच गुंतवणूकदारांना एका लॉटमध्ये साधारण ६६५ रुपयांचा तोटा झाला.

किंमत पट्टा १,८६५-१,९६० रुपये प्रति शेअर

ह्युंदाई मोटर्स या आयपीओला ग्रे मार्केटमध्येही फारसा चांगला प्रतिसाद मिळालेला नव्हता. त्यामुळे हा आयपीओ गुंतवणूकदारांना परतावा देण्यासंदर्भात साशंकता व्यक्त केली जात होती. ह्युंदाई मोटर्सच्या आयपीओचा किंमत पट्टा १,८६५-१,९६० रुपये प्रति शेअर होता. ह्युंदाई मोटर्सतर्फे आयपीओच्या माध्यमातून एकूण १४,२१,९४,७०० शेअर्सची विक्री करण्यात आली होती. हे सर्व शेअर्स ओएफएस श्रेणीतील होते.

भारतीय बाजारातील सर्वात मोठा आयपीओ

ह्युंदाई मोटर्सचा हा आयपीओ भारतीय शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा आयपीओ होता. हा आयपीओ गुंतवणुकीसाठी १५ ऑक्टोबर रोजी गुंतवणुकीसाठी खुला झाला होता. हा आयपीओ एकूण २७,८७०.१६ कोटी रुपयांचा होता. याआधी एलआयसीचा आयपीओ सर्वात मोठा होता. या आयपीओचा आकार २१,००० कोटी रुपये होता. दरम्यान, ह्युंदाई मोटर्सचा आयपीओ सूचिबद्ध झाल्यानंतर गुंतवणूकदारांना तोटा सहन करावा लागत असला तरी भविष्यात ही कंपनी गुंतवणूकदारांना चांगला परतावा देणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## भाजपचा बडा नेता, माजी मंत्री राष्ट्रवादीत; विदर्भात अजित पवारांची ताकद वाढली

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत इनकमिंग सुरु झाले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याचे चित्र होते. आता अजित पवारांनी भाजपच्या बड्या नेत्याला गळाला लावलय. माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलाय. त्यामुळे अजित पवारांना विदर्भात मोठे बळ मिळणार आहे.

विदर्भात अजित पवारांना ताकद वाढणार

माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झालाय. त्यामुळे राष्ट्रवादीला विदर्भात बळ मिळणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोंदियात राष्ट्रवादीला बळ मिळणार आहे. राजकुमार बडोले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. राजकुमार बडोले यांच्यासारख्या अनुभवी नेत्याचा पक्षात समावेश केल्यास पक्षाची स्थिती मजबूत होईल, असे अजित पवार म्हणाले.

राजकुमार बडोले अर्जुनी मोरगाव विधानसभेचे दोन वेळेस आमदार

अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे दोनवेळा आमदार म्हणून प्रतिनिधित्व केलेले राजकुमार बडोले यांचा गोंदिया भागात मोठा प्रभाव आहे. त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळे या महत्त्वाच्या भागात पक्षाची स्थिती मजबूत होणार आहे. माजी मंत्री राजकुमार बडोले हे २००९ ते २०१४ पर्यत भाजपकडून पहिल्यांदा आमदार झाले. त्यानंतर २०१४ च्या निवडणुकीत ते दुसऱ्यांदा मोरगाव अर्जुनी विधानसभेतून आमदार झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये सामाजिक न्याय विभागाच्या मंत्रीपदी त्यांची वर्णी लागली. त्याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं इंग्लंड येथील घर घेण्यात बडोले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे आमदार मनोहर चंद्रिकापुढे यांच्याकडून राजकुमार बडोले यांना केवळ ७१८ मतांनी निसटता पराभव स्वीकारावा लागला होता. त्यानंतर आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गट हा भाजपसोबत आल्याने मोरगाव अर्जुनी विधानसभेची उमेदवारी कोणाला मिळणार हे प्रश्नचिन्ह असतानाच राजकुमार बडोले यांनी आज मुंबई येथे अजित पवार गटात प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार असल्याने आता इथली उमेदवारी कोणाकडे जाते हे पाहणे महत्त्वाचे असेल.

अजित पवार काय काय म्हणाले?

अजित पवार म्हणाले, माजी मंत्री राजकुमार बडोले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा कार्यक्रम प्रदेश कार्यालयात पार पडला. राजकुमार बडोलेंसारखा एक अनुभवी आणि जनसामान्यांसाठी आवाज उठवणारा नेता पक्षात सामील झाल्याने पक्षाची ताकद नक्कीच वाढली आहे, याचा आम्हाला आनंद आहे. त्यांचं मी मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

# अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत; वरळी अन् शिवडीत मनसेची भूमिका काय?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे सध्या आपल्या सभांमधून सत्तेत परतण्याची भाषा करीत आहेत. खरं तर ही निवडणूक मनसे स्वबळावर लढवणार असून, कार्यकर्त्यांना तयारीला लागण्याच्या सूचना राज ठाकरे यांनी दिल्यात. या पार्श्वभूमीवर सध्या राज ठाकरे यांनी विविध मतदारसंघांमधून मनसेच्या उमेदवारांची घोषणा करण्यास सुरुवात केली असून, सोमवारी राज ठाकरे यांनी ठाण्यातून अविनाश जाधव तर कल्याणमधून राजू पाटील यांची उमेदवारी जाहीर केलीय. या आधी शिवडीतून बाळा नांदगावकर तर वरळीतून संदीप देशपांडे यांची उमेदवारी घोषित करण्यात आली होती. मात्र, अद्याप मनसेने आपली अधिकृत पहिली यादी जाहीर केलेली नाही. अशातच अमित ठाकरे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याच्या चर्चांना उधाण आलेलं असून, अमित ठाकरेंसाठी राज ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठिंबा मागितल्याचं बोललं जातंय.

राज ठाकरेंचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा : एका बाजूला स्वबळावर निवडणुका लढवण्याची भाषा करणारे राज ठाकरे दुसरीकडे मुंबईतील तीन जागांसाठी महायुतीचा पाठिंबा मागत असल्याच्या चर्चा आहेत. या विधानसभा निवडणुकीत अमित ठाकरे माहीम विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमित ठाकरे यांना महाविकास आघाडी पाठिंबा देणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात असतानाच लोकसभेत राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे किमान महायुतीने तरी अमित ठाकरे यांना पाठिंबा द्यावा, अशी अपेक्षा सध्या मनसेच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जातेय. या संदर्भात राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सोमवारी एका पंचतारांकित हॉटेलमध्ये चर्चा केल्याचं बोललं जातंय.

वरळीत आदित्य ठाकरे विरुद्ध संदीप देशपांडे लढत : मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत राज ठाकरे यांनी केवळ माहीम विधानसभा मतदारसंघात महायुतीचा पाठिंबा न मागता शिवडी, वरळी विधानसभा मतदारसंघातदेखील पाठिंबा मागितल्याचं बोललं जातंय. महायुतीने राज ठाकरे यांना पाठिंबा दिल्यास वरळी विधानसभेतील लढत आदित्य ठाकरे विरुद्ध संदीप देशपांडे अशी होण्याची शक्यता वर्तवली जातेय. तर शिवडी विधानसभेतील लढत ही अजय चौधरी विरुद्ध बाळा नांदगावकर अशी होण्याची शक्यता वर्तवली जातेय. तसेच विधानसभेत मात्र अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यास बिनविरोध जागा निघू शकते, अशीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

अमित ठाकरे बिनविरोध निवडून येणार का? : महाराष्ट्र निर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्याशी बोलले असता, याबाबत आपल्याला काहीही कल्पना नसल्याचं संदीप देशपांडे यांनी एऊ% भारतशी बोलताना सांगितलं. दरम्यान, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांनी वरळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरत सक्रिय राजकारणात प्रवेश केलाय. त्यावेळी महाराष्ट्र निर्माण सेनेने आदित्य ठाकरे यांना पाठिंबा दिला होता. यावेळी माहीम विधानसभेतील जागा महाविकास आघाडीत ठाकरे गटाच्या वाट्याला जाणार असल्याचं बोललं जात असून, ठाकरे गट या जागेवर आपला उमेदवार देतो? की अमित ठाकरे बिनविरोध निवडून येतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विधानसभा निवडणूक २०२४ : 'या' विधानसभा मतदार संघातून प्रशांत गोळेंना वंचितकडून उमेदवारी

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** वंचित बहुजन आघाडीनं महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पाचवी यादी २१ ऑक्टोंबरला जाहीर केली आहे. या यादीत १६ उमेदवारांचा समावेश आहे. रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघातून प्रशांत गोळे यांना वंचितकडून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे वंचितनं रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघात उमेदवार जाहीर करण्यात आघाडी घेतली आहे.

वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून १६ जणांची यादी : वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी सोमवारी जाहीर करण्यात आली. या यादीत एकूण १६ उमेदवारांची नावं जाहीर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे विधानसभा निवडणूक जाहीर होण्याआधीच वंचितकडून उमेदवारांच्या दोन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत. २१ ऑक्टोंबर रोजी जाहीर केलेल्या यादीत १६ उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये वाशिम जिल्ह्यातील रिसोड विधानसभा मतदार संघातून प्रशांत गोळे यांच्या नावाचा समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीच्या राज्य समितीनं ही उमेदवारी जाहीर केली आहे.

कोण आहेत प्रशांत गोळे : प्रशांत गोळे हे मागील अनेक वर्षापासून रिसोड विधानसभा मतदार संघात सक्रीय आहेत. २०१९ च्या विधानसभेपूर्वी त्यांनी मतदार संघात जनसंपर्क अभियान राबवून विधानसभा लढवण्याची मनिषा व्यक्त केली. परंतु त्यावेळेस त्यांना वंचितकडून उमेदवारी मिळाली नव्हती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला. परंतु विधानसभेपूर्वी त्यांनी पुन्हा वंचितमध्ये प्रवेश घेतला. त्यांचे वडील जिल्हा परिषदेत सभापती होते. आता त्यांना वंचितनं इथून उमेदवारी दिल्यानं रिसोड मतदार संघात चुरस वाढणार आहे.

कारंजा मानोऱ्यातून कुणाला संधी : वंचितनं उमेदवारांची उमेदवारी जाहीर करण्यात आघाडी घेतली आहे. यापूर्वी वंचितनं वाशिम मतदार संघातून मेघा डोंगरे मनवर यांना उमेदवारी दिली. त्यानंतर आता रिसोडमधून प्रशांत गोळे यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली आहे. परंतु अद्यापही कारंजा मानोरा मतदार संघातून उमेदवारी जाहीर केलेली नाही. त्यामुळे इथून कुणाला संधी मिळणार याकडं जिल्हावासीयांचं लक्ष लागून आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### महायुती व महाविकास आघाडी गलिच्छ राजकारण करुन नवी मुंबईकरांच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे कामं करतं आहे- गजानन काळे

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी** : याठिकाणी रोज कोणीतरी पक्ष बदलतोय वडील एका पक्षात तर मुलगा दुसऱ्या पक्षात आमदारकी असो व इतर महत्वाची पद आपल्याच घरात कशी राहतील यासाठी चाललेली ही धडपड आहे. सर्वसामान्य जनतेने यांच्या ह्या राजकारणाला बळी पडू नये मागील १० वर्ष भाजपाच्या आमदारांनी काहीही कामं केलेलं नाही आणि हे बेलापूर करांना माहिती आहे. यावेळी महायुती व महाविकास आघाडीला न जुमानता जनता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवाराला पसंती देईल. २ वर्षांपूर्वी यांना जिल्हाध्यक्षपद दिलं तेव्हा अन्याय नाही झाला का आणि आत्ता तिकीट नाही मिळालं म्हणजे अन्याय झाला तुम्हाला तिकीट नाकारलं म्हणजे नवी मुंबई करावंर अन्याय कसा काय होऊ शकतो असा सवाल मनसे शहर अध्यक्ष गजानन काळेनी उपस्थित केला.सिडकोच्या घराच्या किंमती आम्ही कमी केल्या, जनतेचे कित्येक पैसे आम्ही वाचवले तेव्हा हे कुठे होते.भूमिपुत्र असलेल्या ह्या नेत्यांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांचा मुद्दा असो किंवा साडेबारा टक्क्याचा विषय यांनी अजून सोडवला नाही किंवा नवी मुंबईत एखादा प्रकल्प का आणला नाही.मी प्रकल्प ग्रस्तांच्या रक्ताचा नसलो तरी मला याबद्दल पूर्ण जाणीव आहे.एकदा तुम्ही सर्वांनी राज ठाकरेंच्या मनसे पक्षावर विश्र्वास ठेवावा असे आवाहन गजानन काळे यांनी केले.

### नवी मुंबईत पुन्हा एकदा भाजपचे जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत बनले यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी त्यांचे केले अभिनंदन



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी** : नवी मुंबईतील आज मोठ्या घडामोडी घडल्या,नवी मुंबईचे भाजप जिल्हा अध्यक्ष संदीप नाईक यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्याने रिक्त झालेल्या जिल्हा अध्यक्ष पदावर रामचंद्र घरत यांची निवडझाल्याने,फटाके फोडून,आणि ओवाळणी करून रामचंद्र घरत यांचे जोरदार स्वागत करण्यात आ त्यांचे जल्लोषात स्वागत केले.यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी येऊन घरत यांचे अभिनंदन केले यावेळी त्यांनी रामचंद्र घरत यांच्या रूपाने भाऊ मिळाला असून,आता आम्हाला कुणीच हरवू शकत नसून कोन कुठे गेल्याने आम्हला आव्हान निर्माण होत नसून आम्हाला आव्हान देणारा अजून जन्माल यायचा आहे.असा टोला यावेळी मंदा म्हात्रे यांनी संदीप नाईक यांचे नाव न घेता लगावला...तर भाजपने मला पुन्हा संधी दिल्याने नवी मुंबईतील दोन्ही आमदार भाजाचेच असतील अशी प्रतिक्रिया नव नियुक्त भाजप जिल्हा अध्यक्ष रामचंद्र घरत यांनी दिली.

### निवडणूकीत राजकीय पक्ष राहिले नसून टोळ्या झाल्या आहेत - रघुनाथ पाटील



दैनिक आपला विदर्भ

**पुणे /प्रतिनिधी** : निवडणूकीत राजकीय पक्ष राहिले नसून टोळ्या झाल्या आहेत. त्यामुळे कुठल्याही टोळीत न जाता निवडणुक लढवणार आहे. आम्ही जी मुद्दे मांडत आहे ते कोणीही मांडता नाहित. शेतकरी आत्महत्या कोणीही बोलता नाही. म्हणुन आम्ही निवणुका लढवायची ठरवले आहे. राज्यातील ७ विधानसभा मतदारसंघात आम्ही लढणार अशी माहिती शेतकरी नेते रघुनाथ पाटील यांनी आज दिली.लाडकी बहिण योजना राज्याला आर्थिक दिवाळखोरी जात आहे. जनतेचे चोरा करण्याचे काम हे सगळे राजकीय पक्ष करतात आणि त्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. व्यवस्था बदलना अभिप्रेत होते पण त्यातलं काहीच होत नाही म्हणून आम्ही निवडणूक लढवत आहोत. राज्यातील सर्वच्या सर्व जागा लढण्याचा आणि प्रयत्न करणार आहोत असं ही त्या यावेळी म्हणाले.

### ठरलं! अखेर धनुष्यबाण चिन्हावरच निवडणूक लढवणार, निलेश राणेंची जाहीर घोषणा

**मुंबई /प्रतिनिधी** : सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी आणि रणसंग्राम जोरात सुरू आहे. यातच विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या इच्छुकांची भाऊगर्दी वाढलेली पाहायला मिळतेय. तसेच उमेदवारी न मिळाल्यामुळं अनेक इच्छुकांमध्ये नाराजीनाट्य पसरले असून, येत्या काळात मोठ्या प्रमाणात बंडाचे पडसादही उमटणार आहेत. यातच आता मागील काही दिवसांपासून आयाराम-गयाराम यांना ऊत आलाय. पक्षात सन्मानपूर्वक वागणूक किंवा तिकीट न मिळाल्यामुळं इच्छुक दुसऱ्या पक्षाचा रस्ता धरत आहेत. अशाच आता माजी खासदार आणि भाजपा नेते निलेश राणे यांना भाजपाकडून तिकीट मिळणार नसल्याचं स्पष्ट झाल्यानंतर ते बुधवारी शिवसेना (शिंदे गटात) प्रवेश करणार आहेत. आज त्यांनी पत्रकार परिषद घेतली, त्यावेळी त्यांनी स्वत: शिंदे गटातील पक्ष प्रवेशाची माहिती दिली.

# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली विजया रहाटकर यांची भेट

## रहाटकर यांचे कार्य महिलांना न्याय मिळवून देणारे

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई** : शिवसेना नेत्या तथा विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी राष्ट्रीय महिला आयोगाच्या नवनियुक्त अध्यक्षा विजया रहाटकर यांची त्यांच्या दिल्ली येथील राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केले आणि आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रहाटकर यांच्या कामाचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही उत्कृष्टपणे जबाबदारी पार पाडली आहे. यामध्ये त्यांनी महिलांच्या लैगिक छळाबाबत आवाज उठवत मोलाचे कार्य केले. तसेच यादरम्यान त्यांनी महिलांवरील अन्याय रोखण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले. याखेरीज त्या प्रत्येक गोष्टींची माहिती ठेवत असतात. छत्रपती संभाजी नगर पासून ते राजस्थान भाजपच्या सहप्रभारी असलेल्या विजया रहाटकर यांच्यासोबत कायम संवाद होत असतो. त्या एक व्यक्ती म्हणून देखील चांगल्या असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.



## जय शाह आयसीसीमध्ये रुजू होताच बदलला अध्यक्षपदासाठीचा हा नियम, आता इतक्या दिवसांचा असेल कार्यकाळ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी** : जय शाह गेल्या ५ वर्षापासून बीसीसीआयचे सचिवपद सांभाळत आहेत. आता ते आयसीसीच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेणार आहेत. ते १ डिसेंबरपासून आयसीसीची कमान सांभाळतील. जय शाह यांची ऑगस्टमध्येच घ्ण्ण चे नवीन बॉस म्हणून निवड करण्यात आली होती आणि आता त्यांच्या रुजू होण्याआधी सुमारे एक महिना अध्यक्षपदासाठी नियम बदलण्याची सूचना करण्यात आली आहे. जर तो स्वीकारला गेला, तर तो प्रत्येकी ३ वर्षांच्या दोन टर्मसाठी बॉस राहू शकतो. यापूर्वी अध्यक्षांचा कार्यकाळ प्रत्येकी २ वर्षांच्या ३ टर्ममध्ये असायचा.

आयसीसी बोर्डाची गेल्या आठवड्याच्या शेवटी दुबईत बैठक झाली. यावेळी मंडळाने नियमांमध्ये बदल करण्याबाबत सूचना केल्या होत्या. भविष्यात अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालक यांचा कार्यकाळ प्रत्येकी ३ वर्षांचा असेल, असे बोर्डाने म्हटले होते. सध्या घ्ण्ण चेअरमन प्रत्येकी २ वर्षांचे तीन कार्यकाळ आहेत. सोमवारी २१ ऑक्टोबर रोजी आयसीसीने एक निवेदनही जारी केले आहे. त्यात त्यांनी ही नवीन शिफारस पूर्ण आणि सहयोगी सदस्यांकडे मंजुरीसाठी पाठवली जाईल असे सांगितले. त्यांची परवानगी मिळताच हा नियम लागू होईल. या शिफारसीमागे आयसीसीने अद्याप कोणतेही कारण दिलेले नाही. पण क्रिकइन्फोच्या रिपोर्टनुसार, क्रिकेटची सर्वात मोठी संस्था चांगल्या पद्धतीने चालवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

यामुळे अध्यक्ष आणि स्वतंत्र संचालकांना सुरक्षा आणि स्थिरता मिळेल, असा विश्वास आयसीसी बोर्डाला आहे. दर दोन वर्षांनी निवडणुकीची चिंता न करता ते मोकळेपणाने काम करू शकतील. तथापि, एकूण कार्यकाळ पूर्वीप्रमाणेच राहील, ६ वर्षे. ३५ वर्षीय जय शाह सध्याचे अध्यक्ष ग्रेग बार्कले यांची जागा घेतील. बार्कलेची २०20 मध्ये पहिल्यांदा निवड झाली. तेव्हापासून त्यांनी ३ पैकी २ टर्म पूर्ण केले आहेत. स्वतंत्र संचालक पद रिक्त आहे, ज्याची जबाबदारी माजी अध्यक्ष इंद्रा नूयी यांच्याकडे होती. या वर्षी त्यांनी तिन्ही कार्यकाळ पूर्ण केले.

महिलांच्या क्रमवारीच्या नियमांमध्येही बदल

खउउ मुख्य कार्यकारी समितीने (उएउ) महिलांच्या क्रमवारीत बदल केले आहेत. आयसीसी क्रमवारीत येण्यासाठी कोणत्याही संघाला दरवर्षी एकदिवसीय आणि टी-२० फॉरमॅटमध्ये किमान ८ सामने खेळावे लागतील. यापूर्वी ६ सामने खेळण्याचा नियम होता. रँकिंगचे वार्षिक अपडेट १ ऑक्टोबर ते १ मे या कालावधीत केले जाईल. घ्ण्ण बोर्डाने दुबईमध्ये झालेल्या बैठकीत महिलांच्या इऊइ म्हणजेच २०२५-२०२९ सायकलसाठी फ्युचर टूर प्रोग्रामलाही मान्यता दिली. लवकरच त्याची घोषणा केली जाईल.


## सिलिंडर स्फोटात ५ ठार; ढिगाऱ्याखाली आणखी नागरिक दबल्याची भीती

लखनऊ : घरातील सिलिंडरचा स्फोट होऊन झालेल्या अपघातात तब्बल ५ नागरिकांचा मृत्यू झाला. या घटनेनं मोठी खळबळ उडाली असून घटनास्थळावर ढिगाऱ्याखाली आणखी नागरिक दबल्या गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. ही घटना सिकंदराबाद इथल्या गुलावठी रोडवर असलेल्या आशापुरी कॉलनीमध्ये सोमवारी सायंकाळी घडली. सिलिंडर स्फोट झाल्याची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. घटनास्थळावर बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

घरात झालेल्या सिलिंडर स्फोटात ५ ठार : सोमवारी सायंकाळी उशिरा आशापुरी कॉलनीतील एका घरात मोठा स्फोट झाल्याचं सांगण्यात येत आहे. रात्री आठच्या सुमारास सिलिंडरचा स्फोट झाला. स्फोटामुळे संपूर्ण घर कोसळलं. घरातील अनेक नागरिक या अपघातात गाडले गेले. मोठा आवाज झाल्यानं सेजारील नागरिक घटनास्थळी धावले. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले. ढिगाऱ्याखाली दबलेल्या नागरिकांना बाहेर काढण्याचं काम करण्यात आलं. घटनास्थळावरुन महिला आणि लहान मुलांसह ५ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. या ठिकाणच्या ढिगाऱ्याखाली अजून काही नागरिक दबल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जेसीबीनं उचलला जात आहे ढिगारा : घटनास्थळावर दबलेल्या नागरिकांच्या बचावासाठी जेसीबीची मदत घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही या घटनेची दखल घेतली आहे. बचाव आणि मदत कार्याला गती देण्याच्या सूचना मुख्यमंर्त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## यंदाच्या निवडणुकीत मतदारांसाठी टोकनची खास सोय, निवडणूक अधिकारी यांची माहिती



**नवी मुंबई /प्रतिनिधी** : आज बोरिवली १५२ निवडणूक केंद्रा द्वारे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत विधानसभा निवडणूकी संदर्भात माहिती देण्यात आली. विशेष बाब म्हणजे यंदाच्या निवडणुकीत मतदारांचा वेळ वाचण्यासाठी टोकन सिस्टिम चा वापर करण्यात येणार आहे ज्या मुळे मतदारांचा नाहक त्रास वाचण्यासमदतहोईल अशी माहिती बोरीवली पूर्वेच्या निवडणूक अधिकारी शिल्पा करमाकर यांनी दिली.

## 'लॉरेन्स बिश्नोईचा एन्काऊंटर करा, एक कोटी मिळवा'

नवी दिल्ली : इतरांना जीवे मारण्याची धमकी देणारा कुख्यात गुंड लॉरेन्स बिश्नोईलाच आता जीवे मारण्यासाठी बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. क्षत्रिय करणी सेनेने लॉरेन्स बिश्नोईचा एन्काऊंटर करणा-या पोलिसांना एक कोटी ११ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. क्षत्रिय करणी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राज शेखावत यांनी एक व्हिडीओ प्रसारित करून ही घोषणा केली आहे.

राज शेखावत म्हणाले की, लॉरेन्स बिश्नोईचा एन्काऊंटर कोणत्याही पोलिसाने केल्यास त्याला बक्षिसाची रक्कम देण्यात येईल. तसेच केंद्र आणि गुजरात सरकारने बिश्नोईला सुरक्षा पुरविल्याबद्दल करणी सेनेने टीका केली आहे.

लॉरेन्स बिश्नोई अमली पदार्थाच्या तस्करीप्रकरणी सध्या गुजरातच्या साबरमती कारागृहात आहे. एप्रिमल महिन्यात सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार केल्याप्रकरणातही त्याचे नाव घेण्यात आले होते. मात्र तेव्हा मुंबई पोलिसांना त्याची कोठडी मिळाली नव्हती.

राज शेखावत यांनी पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये बिश्नोईच्या डोक्यावर बक्षीस जाहीर करण्याचे कारण सांगितले. सुखदेव सिंह गोगामेडी यांचा खून केल्याप्रकरणी लॉरेन्स बिश्नोईच्या विरोधात करणी सेनेचा राग आहे. करणी सेनेचे प्रमुख असलेल्या सुखदेव सिंह गोगामेडी यांची ५ डिसेंबर २०२३ रोजी जयपूर येथे हत्या करण्यात आली होती. हत्येच्या काही तासांनंतर लॉरेन्स बिश्नोई गँगने हत्येची जबाबदारी स्वीकारली होती.

## शाहरुख-रणबीर कपूरने जे केले, आता ते करणार अजय देवगण, ३५० कोटी कमावताच इतिहास रचणार!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी** : सिंघम अगेनबाबत वर्षाच्या सुरुवातीपासूनच वातावरण तयार झाले आहे. आता केवळ काही दिवसांची प्रतीक्षा उरली आहे. अजय देवगण दिवाळीला आपल्या सैन्यासह परतणार आहे. पण मार्ग अजिबात सोपा असणार नाही. त्याच दिवशी कार्तिक आर्यनचा 'भूल भुलैया ३' देखील येणार आहे, जो अजय देवगणला टक्कर देणार आहे. अजय देवगणच्या करिअरसाठी हा चित्रपट खूप महत्त्वाचा ठरणार आहे. याचे कारण म्हणजे त्याची कोविड नंतरची कामगिरी. अर्थात अजय देवगणकडे अनेक मोठे सिनेमे आहेत, पण त्याला काही विशेष यश मिळालेले नाही.

कोविड नंतर, अजय देवगणचे ७ चित्रपट प्रदर्शित झाले आहेत, त्यापैकी फक्त २ यशस्वी झाले आहेत. त्याचा शेवटचा चित्रपट 'औरों में कहां दम था' होता, जो फ्लॉप झाला होता. आता तो सिंघम अगेनसोबत ट्रॅकवर परत येऊ शकतो, याकडेही त्याचे लक्ष असेल. खरं तर, कोविडनंतर अनेक कलाकारांच्या चित्रपटांचे मोठे नुकसान झाले आहे. पण यावेळी अजय देवगणला १००० कोटींच्या क्लबमध्ये सामील होण्याची प्रत्येक संधी आहे.

अजय देवगणच्या ७ चित्रपटांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन

रनवे - ३२ कोटी रुपये

थँक गॉड - ३०.७५ कोटी रुपये

दृश्यम २ - २४१ कोटी रुपये

भोला - ९० कोटी रुपये

शैतान - १५१ कोटी रुपये

मैदान - ५३ कोटी रुपये

औरो में कहां दम था - १२.२० कोटी रुपये

खरं तर, आत्तापर्यंत केवळ ६ अभिनेते कोविड रिलीजनंतर एकूण १००० कोटी रुपये गोळा करण्यात यशस्वी झाले आहेत. त्यात शाहरुख खान, दीपिका पादुकोण, प्रभास, अमिताभ बच्चन, रणबीर कपूर आणि ज्युनियर एनटीआर यांचा समावेश आहे. आता अजय देवगणला सातव्या क्रमांकावर येण्याची चांगली संधी आहे, मात्र त्यासाठी त्याला सिंघम अगेनमधून ३९०.०५ कोटी रुपये गोळा करावे लागतील. एवढी कमाई होताच, तो १००० कोटींच्या क्लबमध्ये सामील होईल.

# अवैधरित्या दारुची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई ६३ हजाराचा मुद्देमाल जप्त : डोणगांव पोलीसांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव /प्रतिनिधी** : अवैधरित्या दुचाकीवर दारूची वाहतूक करणाऱ्यावर पोलिसांनी कारवाई करून विदेशी दारूसह ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई दि. २० ऑक्टोबर रोजी डोणगाव पोलिसांच्या वतीने करण्यात आली.

घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार डोणगाव पोलीस स्टेशनचे पी.एस. आय. संदीप सावले, पवन गाभणे, आनंद चोपडे, व चव्हाण हे पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एक इसम मेहकरवरून डोणगावकडे मोटार सायकलवर अवैधरित्या विदेशी दारू घेऊन जात आहे.

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची बघायची भूमिका

एकीकडे अवैध दारू रोखण्यासाठी डोणगांव पोलीस कारवाई करीत असताना मात्र राज्य उत्पादन शुल्क विभाग हा केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने आश्र्चर्य व्यक्त केले जात आहे. निवडणुकीच्या या काळात मोठ्या प्रमाणात अवैध दारू वाहतूक केली जाते त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने हे आपला आळशीपणा झटकून अलर्ट होण्याची गरज आहे असे मत सर्वसामान्य जनतेकडून व्यक्त केले जात आहे.

या माहितीवरून पोलिसांनी पाळत राखून डोणगाव रोडवर हिवरा साबळे येथे नाकाबंदी करून मेहकरकडून एम.एच ३७ आर ९७७४ या क्रमांकाच्या दुचाकीस थांबवून चालकास नाव विचारले असता, त्याने मयूर संतोष सोळंके रा. नेंतसा ता. रिसोड जि. वाशिम असे सांगितले, त्याच्या जवळील पांढऱ्या रंगाची थैलीची तपासणी केली असता त्यामध्ये ७६८० रुपये किमतीची ४८ कॉटर मेक डॉल नंबर वन या कंपनीचे विदेशी दारू तसेच १९०० रुपये किमतीच्या आरसी कंपनीच्या १० कॉटर, २ हजार रुपये किमतीच्या रॉयल ग्रीन व्हिस्की कंपनीचे १० कॉटर, १५०० रुपये किमतीच्या ऑफिसर्स चॉईस कंपनीच्या १० कॉटर व ५० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण ६३०८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनात पी.एस. आय सावले हे करीत आहेत.



## विविध वृत्त...

### निवडणुकीबाबत निवडणूक अधिकाऱ्यांच्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा निवडणुकीबाबत मेहकर विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी नमुना १ नियम ३ प्रमाणे मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी सुचना प्रसिद्ध केली आहे.अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र जोगी यांनी दिली आहे. मेहकर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नमुना १ नियम ३ प्रमाणे निवडणुकीची सूचना प्रसिद्धी केली आहे. की, मेहकर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघातून एका सदस्याची विधानसभेसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध झाला असून यासाठी नामनिर्देशनपत्रे उमेदवाराला किंवा त्याच्या कोणत्याही सुचकाला, निवडणूक निर्णय अधिकारी किंवा भूषण पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दि.२९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सार्वजनिक सुट्टी वगळून कोणत्याही दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशन कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, २५-मेहकर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर नवीन प्रशासकीय इमारत डोणगांव रोड खंडाळा ता. मेहकर जि. बुलढाणा ४४३३०१ येथे दाखल करता येतील. नामनिर्देशनपत्रे वर नमुद ठिकाणी व वेळत मिळू शकतील. नामनिर्देशनपत्राची छाननी दि.३० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता नामनिर्देशन कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी, मेहकर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय मेहकर, नवीन प्रशासकीय इमारत डोणगांव रोड खंडाळा ता.मेहकर जि.बुलढाणा येथे करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना उमेदवाराला किंवा उमेदवाराने लेखी प्राधिकार दिलेल्या त्याच्या कोणत्याही सुचकाला किंवा निवडणूक प्रतिनिधीला, वरील परिच्छेद (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयात दि.४ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत देता येईल. निवडणूक लढविली गेल्यास दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान घेण्यात येईल. अशी माहिती मेहकर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकरी रविंद्र जोगी यांनी दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

### देवळी पुलगावमध्ये उमेदवारी दिल्याने राजेश बकाने यांनी पक्षश्रेष्ठींचे मानले आभार

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी** : वर्धा जिल्ह्यामध्ये भाजपचे तीन उमेदवार यांची उमेदवारी जाहीर झाली आहेत. वर्धा जिल्ह्यामध्ये येत्या २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणूक होणार आहे. अशातच पक्षाची तिकीट कुणाला मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. देवळी पुलगाव विधानसभा क्षेत्रात राजेश बकाने, हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात समीर कुणावार व वर्धा विधानसभा क्षेत्रात डॉ. पंकज राजेश भोयर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. आता फक्त वर्धा जिल्ह्यात आर्वी विधानसभा क्षेत्र ची उमेदवारी पक्षाकडून मिळणे बाकी राहिली आहे. देवळी पुलगावमध्ये उमेदवारी दिल्याने राजेश बकाने यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले आहेत आणि धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीचा विजय होतो, बेरोजगारी, एमआयडीसी, शेतकऱ्यांचे पांदन रस्ते, दवाखाना असे अने विषय घेऊन पुढे जाणार अशी प्रतिक्रिया राजेश बकाने यांनी दिली आहे.

### अल्लीपूर येथे महिला बचत गटाच्या माध्यमातून द्रोण, पत्रावळ लघु व्यवसायाला शून्यातून केली सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी** : वर्धा जिल्ह्यातील महिला बचत गटा द्वारे महिलांनी गावामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून अल्लीपूर येथील महिला बचत गटातील सविता केशव गायधने या महिलेने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमधून पत्रावळ, द्रोणचा लघू व्यवसाय सुरू केला आहे. महिलांनी चुल व मूल न सांभाळता त्यापलीकडेही काहीतरी वेगळे करावे या उद्देशाने महिला बचत गटातील सविता केशव गायधने या महीलेने हा व्यवसाय सुरु केला आहे.महिला कठीण परिस्थितीवर मात करुन लघुउद्योग करू शकतात हा संदेश या लघू व्यवसायातून मिळत आहे.

### तारकचा बॉस परतल्याने हुशार योजना थांबली! बडे गुरुजी म्हणून बापूजी पुन्हा वाचवणार?

**मुंबई /प्रतिनिधी** : सोनी सब या वाहिनीवर 'तारक मेहता का उलटा चष्मा'या लोकप्रिय मालिकेला चाहत्यांकडून अतोनात प्रेम मिळत आहे. सर्वांचं मनोरंजन करणार्या या मालिकेत सध्या मजेदार पण तणावपूर्ण वळण येणार आहे. नेहमी कडक आणि मागणी करणारा तारक मेहताचा बॉस काही दिवसांसाठी दिल्लीला जाण्याचा विचार करतो, ज्यामुळे तारकला थोडा दिलासा मिळतो. मात्र त्याचा बॉस शहराबाहेर असताना, तारक असा दावा करून परिस्थितीचा फायदा घेतो. परंतु अचानक बॉस परत आल्यामुळे सर्वांची तारांबळ उडणार आहे. सर्व काही व्यवस्थित सुरु असताना अनपेक्षित घडते. बॉस अघोषितपणे मुंबईला परततो आणि बडे गुरुजींना भेटण्याचा आग्रह धरतो. भागीदारी जास्त आहे कारण कंपनीला बडे गुरुजींच्या व्यावसायिक सल्ल्याचा आधीच फायदा झाला आहे, परिणामी मोठा नफा झाला आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात अपूर्ण कामे पूर्ण दाखवून शासनाची फसवणूक, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ
■ देवानंद सानप

**बुलडाणा** : बुलढाणा जिल्ह्यातील अपूर्ण कामे पूर्ण झाली असल्याची दाखवून निधीचा अपहार करून शासनाची फसवणूक केली आहे. तरी शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मृदू व जलसंधारण विभाग मंत्रालय सचिव यांच्याकडे तक्रारीद्वारे केली आहे.

विरोधी पक्षनेते यांनी मृदू व जलसंधारण विभाग सचिव मंत्रालय मुंबई यांच्याकडे दि.१५ ऑक्टोबर रोजी केलेल्या तक्रारीत नमुद बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा व देऊळगाव राजा तालुक्यातील वरदडी तांडा क्र.३. खैरखेडी क्र.७, चिंचोली जहा क्र.३, आचली क्र ९, चिचोली बुद्रुक क्रमांक ६, वाधोरा क्रमांक ४, पिंपरी आंधळे क्रमांक ४, पिंपरखेड क्रमांक ५, मेव्हणा राजा क्रमांक ५, सुरा क्रमांक ५, बोरखेडी गंडे क्रमांक ७ व दत्तापुर क्रमांक ६ अशा एकूण १२ द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधाऱ्यांच्या कामांसाठी एकूण रुपये १७.८० कोटी निधीचे वितरण केले आहे. परंतु, यापैकी कोणतेही काम अद्याप सुरू देखील झालेली नाही, तसेच सद्या पूर्ण असलेली ५ कामें अपूर्ण असल्याचे दाखवून शासनाकडे निधी मागणी करण्यात आली व निधी मिळाल्यावर नंतर सदर कामे पूर्ण केली आहेत.

आता अपूर्ण असलेल्या ७ कामांची छायाचित्रे सोबत जोडली आहेत. या ७ अपूर्ण कामांची कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगनमत करून बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली असून सदर बनावट कागदपत्रांच्या आधारे ही कामे पूर्ण झाल्याचे दाखवून शासनाकडे त्यासाठी तब्बल रुपये ११ कोटी निधीची मागणी करण्यात आली व त्यास



शासनाकडून निधी देण्यात आला आहे. या उलट बुलढाणा जिल्ह्यातील अन्य बरीचशी मंजूर कामे पूर्ण झाली असून त्यास अद्याप निधी मिळालेला नाही. अशी बाब माझ्या निर्दशनास आलेली आहे.तरी बुलढाणा जिल्ह्यातील वरील नमूद १२ द्वारयुक्त साठवण बंधा-यांची अपूर्ण कामे पूर्ण झाल्याची दाखवून निधी मागणी केल्याप्रकरणी शासनाकडून उच्चस्तरीय सखोल चौकशी करण्यात यावी तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर अपूर्ण कामांची देयके अदा करण्यात येऊ नयेत व चौकशी अंती शासनाची फसवणूक करणाऱ्या व निधीचा अपहार करणाऱ्या कंत्राटदार व दोषी बुलढाणा जिल्ह्यातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२७ जुलै, २०१५ रोजी शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मृदू व जलसंधारण विभाग सचिव मंत्रालय मुबंईय यांच्याकडे दि.१५ऑक्टोबर रोजी तक्रारीद्वारे केली आहे.

### परिवर्तन महाशक्तीच्या निवडणूक समन्वयपदी धनंजय जाधव यांची निवड

**पुणे/प्रतिनिधी** : परिवर्तन महाशक्तीच्या विधानसभा निवडणूक सुकाणू समितीच्या पुणे येथील बैठकीत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे धनंजय जाधव यांची समन्वयक तर सहसमन्वयक म्हणून प्रहार जनशक्तीचे गौरव जाधव तर स्वाभिमानी पक्षाचे योगेश पांडे या तिघांच्या नावाची अधिकृत निवडणूक समन्वयक म्हणून घोषणा करण्यात आली.परिवर्तन महाशक्तीच्या सुकाणू समितीची बैठक पुण्यातील महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या कार्यालयात पार पडली.

या बैठकीला महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे संभाजीराजे छत्रपती, प्रहार जनशक्तीचे बच्चू कडू, स्वाभिमानी पक्षाचे राजू शेट्टी यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत सर्वानुमते महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे धनंजय जाधव यांची नावाची सम न्वयक म्हणून निवडीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सिंदखेड राजा मतदारसंघाला दिली भेट

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : केंद्रीय निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ निवडणूकीचा कार्यक्रम घोषित झाला असून दि. १५ ऑक्टोंबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने आज दि. २२ ऑक्टोबर रोजी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सिंदखेडराजा मतदारसंघाला भेट दिली. यावेळी मतदान केंद्रातील सोयीसुविधाची पाहणी करुन तहसील कार्यालयामधील नामांकन अर्ज मिळणाऱ्या कक्षाला भेट दिली.





यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संजय खडसे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सिंदखेडराजा अजित दिवटे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, गट विकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश माहोर, मुख्याधिकारी नगरपरिषद सिंदखेड राजा प्रशांत व्हटकर, निवडणुक नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, निवडणूक नायब तहसीलदार प्रवीण घोटकर, नायब तहसीलदार सिंदखेडराजा अस्मा मुजावर, नायब तहसीलदार सिंदखेडराजा प्रवीणकुमार वराडे, नायब तहसीलदार देऊळगाव राजा सायली जाधव, नायब तहसीलदार देऊळगाव राजा प्रांजल पवार, नोडल अधिकारी प्रसारमाध्यम अंकुश म्हस्के, श्री. पडघान आदि उपस्थित होते.

निवडणूक उमेदवारांचे अर्ज हे मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या तहसील कार्यालय येथील दालनामध्ये अर्ज स्विकारले जाईल. अर्ज स्वीकृतीसाठी उमेदवारा सोबत फक्त ५ व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. आज दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी २४-सिंदखेडराजा मतदारसंघांसाठी १९ व्यक्तींनी एकूण ३६ नामांकन अर्ज घेतले आहेत. तर नामनिर्देशन अर्ज कोणीही दाखल केले नाही.

# बौद्धधम्म आणि बाबासाहेबांचे विचार सदैव प्रेरणादायक - आमदार संजय रायमुलकर

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी** : तथागत गौतम बुद्धांनी दिलेला धम्म विचार आणि डॉ.बाबासाहेब आंबेकरांनी दिलेले तत्वज्ञान हे सदैव प्रेरणादायी असून समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य खूपच प्रभावी आहे,असे विचार आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केले.



यशोधरा महिला मंडळ ,आनंद बौद्ध विहार, अशोका भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका यांच्यावतीने वाटिकेत ग्रंथ समापन सोहळा व धम्ममेळाव्यात मार्गदर्शन करतांना आमदार रायमुलकर यांनी वरील विचार व्यक्त केले. भंतेजी , भाई कैलास सुकदाने ,किशोर गवई यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. सोहळ्याला बौद्ध समाज बंधू भगिनींची मोठी गर्दी होती. आयोजकांच्या वतीने यावेळी संजय रायमुलकर यांचा सत्कार करण्यात आला.

संपूर्ण मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात विकास कामे करतांना मी कधीही भेदभाव केला नाही. इथला विकास हेच माझे एकमेव ध्येय आहे, असेही आमदार रायमुलकर म्हणाले. अशोका भवन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिकेच्या सुशोभीकरणासाठी कर्तव्य भावनेने निधी उपलब्ध करून दिला. गाव तेथे संविधान भवन बांधण्याचे माझे स्वप्न आहे, असेही ते पुढे म्हणाले. वाटिकेच्या विकासासाठी आम्ही ५० लाखाच्या निधीची मागणी केली होती, परंतु आमदार रायमुलकर यांनी दोन कोटी रुपये उपलब्ध करून दिले,असे आपल्या भाषणात भाई कैलास सुकदाने म्हणाले.

यावेळी शाहीर संघपाल गवई व शाहीर आरतीताई इंगळे यांच्या भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी भंते ज्ञानज्योती , भंते महाथेरो, भंते ज्ञानरक्षित, भंते गुणरत्न , भंते महेंद्रबोधी, भंते शिलरत्न यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४: आज एकही नामनिर्देशनपत्र दाखल नाही

## सात मतदारसंघात १०५ व्यक्तीनी १८८ नामनिर्देशन अर्जाची उचल

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सार्वत्रिक विधानसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सात मतदारसंघात आज मंगळवार दि. २२ ऑक्टोंबर २०२४ रोजी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नाही. दरम्यान आज सात मतदारसंघात एकूण १०५ व्यक्तींनी १८८ नामनिर्देशन अर्जाचे उचल केले.

मतदारसंघ निहाय माहिती याप्रमाणे : २२-मलकापूर विधानसभा मतदारसंघात १८ व्यक्तीनी ४१ अर्ज, २३-बुलढाणा विधानसभा मतदारसंघात १३ व्यक्तीनी २२ अर्ज, २४-चिखली विधानसभा मतदारसंघात २६ व्यक्तीनी ४६ अर्ज, २४-सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात १९ व्यक्तीनी ३६ अर्ज, २५-मेहकर विधानसभा मतदारसंघात एकही अर्ज उचल नाही, २६-खामगांव विधानसभा मतदारसंघात १४ व्यक्तीनी २२ अर्ज व २७-जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघात १५ व्यक्तीनी २१ अर्ज असे एकूण १०५ व्यक्तींनी १८८ अर्ज उचल केले आहे.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी मंगळवार दि. २९ आक्टोंबर हा नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक असणार आहे. बुधवार दि. ३० ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. सोमवार दि. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

# साकोलीत भाजपचा उमेदवार असेल

## चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रसारमाध्यमांना माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** :उद्धव ठाकरे यांनी केलेली आघाडी ही अनैसर्गिक आहे,त्यांचे हाल होत आहेत. शिवसेनाप्रमुखांनी सांगितलं होते शिवसेना काँग्रेसकडे जाईल, त्या दिवशी पक्ष बंद करावा लागेल ते आज खर होत आहे. असा टोला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिवसेनेला लगावला.तर साकोलीत भाजपचा उमेदवार असेल असे ते म्हणाले.



नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बावनकुळे बोलत होते.

यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे म्हणाले की, आमची नैसर्गिक युती होती. आम्ही मातोश्रीला मान सन्मान द्यायचो,मात्र आता जे होत आहे त्याला उद्धव ठाकरे जबाबदार आहेत. काँग्रेस उद्धव ठाकरेंना सहन करणार नाही, महायुतीत विदर्भ उद्धव ठाकरेंना सन्मानजनक जागा देत होतो, पण आज परिस्थिती बघत आहे. काँग्रेस विदर्भात शिवसेनेला धोबीपछाड करण्याचे काम करीत आहे.असे ते म्हणाले तसेच निलेश राणे संदरर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत प्रत्येकाला आपला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. ते त्यानुसार निर्णय घेतील. तर संदीप नाईक काही दिवसांपूर्वी बोलले होते की मी स्वतंत्रपणे निर्णय घेईल आणि त्यांनी तो घेतला आहे. तर अनिल देशमुख यांनी स्वतःचे पुस्तक स्वतः लिहिणे आहे त्याला समाजाची मान्यता नाही,त्यांना बराच रिकामा वेळ होता म्हणून त्यांनी पुस्तक लिहले असेल, असा टोलाही त्यांनी लगावला. तसेच एकनाथ शिंदे नाराज नाहीत, कपोलकल्पित बातम्या आहेत, साकोलीत भाजपचाच उमेदवार असेल, असे त्यांनी ठणकावून सांगितले. देवेंद्र फडणवीस आणि आम्ही एकाच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचेही यावेळी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.